श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .



# वार्षिक अहवाल सन २०२१-२०२२

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

## संचालक मंडळ

| अ . क . | संचालकांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री . सतीश अशोक मदने | अध्यक्ष |
| २ | श्री . ज्ञानेश्वर धोंडीराम क्षिरसागर | उपाध्यक्ष |
| ३ | श्री . योगेश चंद्रकांत देशमुख | सचिव |
| ४ | श्री . सुधीर रामकृषण घाडगे | खजिनदार |
| ५ | श्री . संतोष दत्तात्रय टकले | संचालक |
| ६ | श्री . अनिल तुळशीराम हिरवे | संचालक |
| ७ | श्री . आंनदा भिकोवा थोरात | संचालक |
| ८ | श्री . भुराराम हेमाराम सुतार | संचालक |
| ९ | सौ . सुरेखा लक्ष्मण जानकर | संचालिक |
| १० | सौ . चित्रांगी संदिप गायकवाड | संचालिका |
| ११ | सौ . सुरेखा लिंवराज उकिरडे | संचालिका |

## कर्मचारी वृंद

| अ क | कर्मचारी नाव | पद |
|---|---|---|
| १ | सौ . सारिका सचिन कुलकर्णी | व्यवस्थापक |
| २ | कु . सौरभ रामेश्वर क्षिरसागर | अकौटंट |

## दैनंदिन ठेव प्रतिनिधी

| अ क | दैनंदिन ठेव प्रतिनिधींचे नाव | अ क | दैनंदिन ठेव प्रतिनिधींचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सौ . अनिता ज्ञानेश्वर क्षिरसागर | ४ | श्री . सतीश हरिभाऊ शहाणे |
| २ | सौ . नंदा अनिल हिरवे | ५ | सौ . सुनिता विजय जाथव |
| ३ | श्री . सागर सुरेश यनपुरे | ६ | श्री . दिलीप एम मुटके |

# श्रेयस को-ऑप क्रेडीट सोसा लि. नवी सांगवी पुणे ४११०२७.

## २० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १५ मे २०२२ रोजी सायं.६.०० वा "शिव अपार्ट",गणेश मंदीरासमोर,फेमस चौक, नवी सांगवी पुणे-२७"या ठिकाणी खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासद बंधु -भगिनींनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे. ही आग्रहाची नम्र विनंती.

-ः **सभेपुढील विषय** ः-

१. सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
२. दिनांक ११ जुलै २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
३. सन २०२१-२०२२ अखेरचा कार्यकारी मंडळाचा वार्षिक अहवाल,ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मान्यता देणे.
४. सन २०२१-२०२२ या सालच्या वैद्यानिक व अंतर्गत लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करून नोंद घेणे.
५. सन २०२१-२२ वैधानिक लेखापरिक्षकाचे अहवालाच्या दोष दुरूस्ती अहवालावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
६. सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणुक करणे.
७. सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता वैद्यानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे.
८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालकांना व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करणे.
१०. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
**श्री. योगेश चंद्रकांत देशमुख**
सचिव

स्थळ-नवी सांगवी पुणे २७.
दिनांक- ०२/०५/२०२२.

---

-ः **विशेष सुचना** ः-

१)गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२)ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत सुचना किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दिनांक ०२/५/२०२२ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात आणुन द्याव्यात त्यानंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही.

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

**प्रस्तावना ः-**

सन्माननीय सभासद वंधु-भगिनीनो,सप्रेम नमस्कार आपल्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी आपणा सर्वाचे हार्दिक स्वागत करतो . आपल्या संस्थेच्या २० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा अहवाल ताळेवंद पत्रक व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यासमोर सादर करताना मला सार्थ अभिमान वाटत आहे . कारण आपण सर्वांनी मिळून लावलेले हे छोटेसे रोपटे संचालक मंडळाच्या परिश्रमाने व आपल्या सर्वाच्या सहकार्यने फुलायला लागले असुन लवकरच त्याचा वटवृक्ष होईल असा मला सार्थ विश्वास वाटतो . संस्थेच्या प्रगतीचा अहवाल हा वाढत चाललेला आहे . संस्थेच्या अहवालाची तपशीलवार माहीती आपल्यासमोर सादर करीत आहे .

**सभासद ः-**

वर्षारंभी सस्थेची सभासद संख्या ७३६ एवढी होती . अहवाल सालात ६६ नवीन सभासद झाले असून २४ सभासदांनी राजीनामे दिलेले आहेत . दिनांक ३१/०३/२०२२ रोजी संस्थेची सभासद संख्या ७७८ इतकी आहे .

**भागभांडवल ः-**

संस्थेचे दिनांक ३१.०३.२०२१ अखेर भाग भांडवल रू.४१,९६,000/-(रू एक्केचाळीस लाख श्योंनो हजार फक्त) इतके होते . अहवाल सालात रू.६,८१,000/-(रू.सहा लाख एक्याऐंशी हजार सहाशे फक्त) जमा झाले असून रू.३,४०,१00/-(रू.तीन लाख चाळीस हजार शंभर फक्त) इतके परत केलेले आहे . दिनांक ३१.०३.२०२२ अखेर संस्थेचे एकूण वसुल भागभांडवल रू.४५,३६,९00/-(रू पंचेचाळीस लाख छत्तीस हजार नऊशे फक्त) इतके दिसत आहे .

**राखीव निधी व इतर निधी ः-**

**अ) राखीव निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे राखीव निधी रू.५,३९,६५४/-(रू.पाच लाख एकोणचाळीस हजार सहाशे चौपन्न फक्त) जमा होता . दिनांक ३१.०३.२०२२ अखेर राखीव निधी रू.५,९६,६५३/-(रू.पाच लाख श्यानों हजार सहाशे त्रेपन्न फक्त) इतके दिसत आहे .

**ब) इमारत निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे इमारत निधी रू.११,६८,000/-(रू.अकरा लाख अडुसष्ट हजार फक्त) जमा होता . दिनांक ३१.०३.२०२२ अखेर इमारत निधी रू.१३,१५,000/-(रू.तेरा लाख पंधरा हजार फक्त) दिसत आहे .

**क) लाभांश समीकरण निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे लाभांश समीकरण निधी रू १,५0,000/-(रू.एक लाख पन्नास हजार फक्त) जमा होता . दिनांक ३१.०३.२०२२ अखेर सभासद कल्याण निधी रू १,७0,000/-(रू.एक लाख सत्तर हजार फक्त) दिसत आहे

**ड) सभासद कल्याण निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे सभासद कल्याण निधी रू.१,५0,000/-(रू. एक लाख पन्नास हजार फक्त) जमा होता . दिनांक ३१.०३.२०२२ अखेर सभासद कल्याण निधी रू.१,५५,000/-(रू. एक लाख पंचावन्न हजार फक्त) दिसत आहे .

**इ) विद्यार्थी निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे विद्यार्थी निधी रू.१२५,000/-(रू.एक लाख पंचवीस हजार फक्त) जमा होता. दिनांक ३१.०३.२०२२ अखेर विद्यार्थी निधी रू.१,३0,000/-(रू.एक लाख तीस हजार फक्त) दिसत आहे.

**ई)धर्मदाय निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे धर्मदाय निधी रू.६५२४५.0४ (रू.पासष्ट हजार दोनशे पंचेचाळीस फक्त) जमा होता.दिनांक ३१.०३.२०२२ अखेर धर्मदाय निधी रू.६२२६२.७८ (रू.वासष्ट हजार दोनशे वासष्ट रूपये अठ्ठयाहत्तर पैसे फक्त) दिसत आहे.

**उ) सहकार व प्रशिक्षण निधी ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे सहकार व प्रशिक्षण निधी रू.२५000/- (रू. पंचवीस हजार फक्त) जमा होता.दिनांक ३१.०३.२०२२ अखेर सहकार व प्रशिक्षण निधी रू.३0000/- (रू. तीस हजार फक्त) दिसत आहे.

**ऊ) उत्तम जिंदगी तरतूद ः-**

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर संस्थेकडे उत्तम जिंदगी तरतूद रू.१०६४६२/- (रू.एक लाख सहा हजार चारशे बासष्ट रुपये फक्त) इतकी होती. दिनांक ३१.०३.२०२२ अखेर उत्तम जिंदगी तरतूद खाते रू.१५0000/- (रू.एक लाख पन्नास हजाार रुपये फक्त) दिसत आहे.

**ऊ) एनपीए तरतुदः-**

दिनांक ३१.०३.२०२२ अखेर संस्थेकडे एनपीए तरतुद रू.१३२५६०४/- (रू.तेरा लाख पंचवीस हजार सहाशे चार रुपये) इतकी होती.दिनांक ३१.०३.२०२२ अखेर एनपीए तरतुद खाते रू.२000000/- (रू.वीस लाख रुपये) दिसत आहे.

**ठेवी ः-**

वर्षाआरंभी संस्थेकडे रू ४,९०,८४,९९०.७४ (रू.चार कोटी नव्वद लाख चौ-याऐंशी हजार नऊशे नव्वद फक्त) ठेवी जमा होत्या.अहवाल सालात एकूण ठेवी पोटी रू.१,६0,७४,४९५.३६(रू.एक कोटी साठ लाख चौ-याहत्तर हजार चारशे पंच्यानो रूपये छत्तीस पैसे फक्त) इतकी वाढ झालेली आहे.दिनांक ३१.०३.२०२२ अखेर रू ६,७१,७९,४८७.९० (रू.सहा कोटी एक्कावन्न लाख एकोणसाठ हजार चारशे पंच्याऐंशी रूपये नव्वद पैसे फक्त) इतकी ठेवीची रक्कम संस्थेकडे जमा दिसत आहे.

**सभासद कर्ज वाटप ः-**

**कर्जे ः-**

वर्षाआरंभी संस्थेचे एकूण कर्ज येणे वाकी रू.४,२७,७४,१८६/-(रू. चार कोटी सत्तावीस लाख चौ-याहत्तर हजार एकशे श्याऐंशी फक्त) होते.अहवाल सालात रू.७३,१४,७६0/-(रू.त्रेहत्तर लाख चौदा हजार सातशे साठ रूपये फक्त) कर्जापोटी जमा झालेले असून दिनांक ३१.०३.२०२२ अखेर एकूण कर्ज रू.५,00,८८,९४६/-(रू.पाच कोटी अठ्ठयाऐंशी हजार नऊशे शेचाळीस फक्त) इतके येणे दिसत आहे.

**गूंतवणुक ः-**

संस्थेच्या संचालक मंडळाने मुदत ठेवीच्या स्वरूपात खालीलप्रमाणे बॅकांमध्ये गुंतवणुक केलेली आहे . पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे शेअर्स मध्ये रू . १०,000/-(रू . दहा हजार फक्त)पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशन शेअर्स मध्ये रू . २,000/-(रू . दोन हजार फक्त) प्रेरणा को ऑप बॅक लि . सांगवी रू . १0,८३,८७९/-(रू . दहा लाख त्रेऐंशी हजार आठशे एकोणऐंशी फक्त) टीजेएसबी बॅक. शाखा नवी सांगवी येथे रू २९,४८,४३१/-(रू . एकोणतीस लाख अठ्ठेचाळीस हजार चारशे एकत्तीस फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक. शाखा सांगवी येथे मध्ये रू . ३,00,000/-(रू . तीन लाख फक्त) श्री कालिका अर्बन सोसा . लि रू ४६,00,000/- (रू . शेचाळीस लाख फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे लाभांश समीकरण निधी गुंतवणुक रू . १,७0,000/-(रू . एक लाख सत्तर हजार फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे सभासद कल्याण निधी रू . १,५५,000/-(रू . एक लाख पंचावन्न हजार फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे विद्यार्थी निधी गुंतवणुक रू . १,३0,000/-(रू . एक लाख तीस हजार फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे धर्मदाय निधी गुंतवणुक रू . ६५,२४५/-(रू . पासष्ट हजार दोनशे पंचेचाळीस फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारो बॅंक शाखा सांगवी येथे प्रशिक्षण निधी गुंतवणुक रू . ३0,000/-(रू . तीस हजार रु फक्त) पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बॅंक शाखा सांगवी येथे इमारत निधी गुंतवणुक रू . १,३१,५00/-(रू . एक लाख एकत्तीस हजार पाचशे फक्त) दि महानगर बॅक रू . ४६,८५,0८४/- (शेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार चौ-याऐंशी रु फक्त.) श्री शंकर नागरी पतसंस्था. शाखा नवी सांगवी येथे रू ५४,५0,000/-(रू . चौपन्न लाख पन्नास हजार फक्त) पवना सहकारी बॅक रू . १0,00,000/-(दहा लाख फक्त) श्री लक्ष्मण नागरी पतसंस्था रू . २0,0१,000/-(वीस लाख एक हजार रूपये फक्त) गुंतवणुक केलेली असून संस्थेने विनापरत ठेवीमध्ये रू . ५,९९,७३0/-(रू . पाच लाख नव्यानो हजार सातशे तीस फक्त) गुंतवणुक केलेली आहे . दिनांक ३१ . 0३ . २0२२ अखेर रू . २,३३,६१,८६९/-(रू . दोन कोटी तेहत्तीस लाख एकसष्ट हजार आठशे एकोणसत्तर फक्त) मुदत ठेवीत व शेअर्स मध्ये गुंतवणुक केली आहे . एकूण ठेवींच्या ३५ . ८५% इतकी गुंतवणूक केलेली आहे .

**व्यवस्थापक समिती व मासिक सभा ः-**

संस्थेची व्यवस्थापक समिती एकूण ११ व्यक्तींची असून अहवाल सालात **मा . श्री . सतीश अशोक मदने** यांनी अध्यक्ष , **मा . श्री ज्ञानेश्वर धोंडिराम क्षिरसागर** यांनी उपाध्यक्ष, **मा . श्री . योगेश चंद्रकांत देशमुख** यांनी सेकेटरी म्हणून **मा . श्री . सुधिर रामकृष्ण घाडगे** यांनी खजिनदार म्हणून **मा . सौ . सारीका सचिन कुलकर्णी** यांनी व्यवस्थापक म्हणून तसेच इतर संचालकांनी एकत्रितपणे काम पाहिलेले आहे . अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा झालेल्या असुन सर्व ठराव एकमताने मंजुर करण्यात आलेले आहेत .

**नफा वाटणी ः-**

संस्थेस सन २0२१-२0२२ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत सर्व तरतुदीनंतर खर्च वजा जाता रू . ७,४६,४0९ . 0३ (सात लाख शेचाळीस हजार चारशे नऊ रू . तीन पैसे फक्त) इतका निव्वळ नफा झाला आहे . संस्थेच्या संचालक मंडळाने सहकार कायदा, कानुन व पोटनियमानुसार नफ्याची विभागणी खालील प्रमाणे करण्याची शिफारस केलेली आहे . त्यास सर्व सभासदानी मंजुरी दयावी ही विनंती .

| अ.क. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | रिर्झव्ह फंड २५ % प्रमाणे रू. | १,८६,६०२.00 |
| २ | इमारत निधी खाते रू. | १,८५,000.00 |
| ३ | लाभांश समीकरण निधी रू. | ३0,000.00 |
| ४ | सभासद कल्याण निथी रू. | ३५,000.00 |
| ५ | विद्यार्थी कल्याण निधी रू. | २0,000.00 |
| ६ | धर्मदाय निधी खाते रू. | ७.0३ |
| ७ | सहकार व प्रशिक्षण निधी रू. | १0,000.00 |
| ८ | निवडणुक निधी रू. | २0,000.00 |
| ९ | कर्मचारी कल्याण निधी रू. | ५0,000.00 |
| १0 | लाभांष देणे सन २0२१-२२ रू. | २,0९,८00.00 |
| | एकूण रू. | ७,४६,४0९.0३ |

**सेवक वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी ः-**

संस्थेच्या आर्थिक विकासाकरीता काम करणा-या अनेक घटकापैकी संस्थेचा सेवक वर्ग हा देखील एक महत्वाचा घटक आहे. सेवकांनी अहवाल सालात संचालक मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाची अंमलवजावणी करून व हिशोव पत्रके व्यवस्थित ठेवुन संस्थेच्या सर्वागिण प्रगतीसाठी जे मोलाचे सहकार्य केले त्यावददल संचालक मंडळाच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो व यापुढेही त्यांच्याकडुन असेच सहकार्य मिळेल अशी आशा वाळगतो. त्याचप्रमाणे दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांनी देखील संस्थेच्या प्रगतीमध्ये मोलाचे सहकार्य केल्यावद्दल त्यांचे देखील आभार मानतो व यापुढेही त्यांच्याकडुन असेच सहकार्य मिळेल अशी आशा वाळगतो.

**लेखापरिक्षण अहवाल ः-**

सन २0२१-२0२२ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षण **सौ. जोशी एस एस** प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था, पुणे यांनी पुर्ण करून लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे. त्यानी संस्थेच्या कामकाजावावत समाधानकारक असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

सन २0२१-२0२२ या आर्थिक वर्षाचे वैद्यानिक लेखापरिक्षण **सौ. बी टी जाधव** (पीएनए १३३५0) प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था, पुणे यानी पुर्ण केले असुन आर्थिक वर्षाकरीता संस्थेस ऑडीट वर्ग **'अ'** देण्यात आलेला आहे. सदर वाव संस्थेकरिता अतिशय अभिमानाची आहे. एकीकडे सहकार क्षेत्रावरील लोकांचा विश्वास कमी होत असताना अशा परिस्थितीमध्ये आपल्या संस्थेमध्ये सभासदांनी ठेवी ठेवलेल्या आहेत. ती वाव अतिशय विश्वासाची आहे. त्यामुळे संस्थेवर विश्वास दाखविलेल्या सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतकांचे मी आभार मानतो.

**थकबाकी व एनपीए ः-**

अहवाल सालात काही सभासदांनी घेतलेल्या कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर न भरल्यामुळे कर्ज थकवाकीचे प्रमाण हे १0.0३ % इतके असून संस्थेच्या एकुण नफ्यातुन एन.पी.ए. साठी रू.२0,00,000/-(रू. वीस लाख फक्त) इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी कर्जदारांनी आपली थकवाकी त्वरीत भरून कर्ज थकवाकीचे प्रमाण निरंक आणण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती करतो.

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

**हार्दिक आभार व समारोप ः-**

१)संस्थेच्या सर्व सभासद, खातेदार व ठेवीदार यांनी संस्थेवर जो विश्वास दाखविला त्यावददल त्यांचे आभार

**२)अहवाल सालात संस्थेचे बँकर्स** अ)पुणे जिल्हा म . सह . बँक मर्या . शाखा सांगवीगाव,पुणे ब)श्री गणेश सह . बँक मर्या . शाखा नवी सांगवी. पुणे क)दि सेवा विकास को . ऑप बँक लि . शाखा नवी सांगवी. पुणे इ)प्रेरणा को-ऑप बँक लि शाखा , सांगवी. पुणेड)धर्मवीर संभाजी को-ऑप बँक लि . शाखा नवी सांगवी,पुणे ई)टीजेएसबी बँक लि शाखा, नवी सांगवी. पुणे वरील सर्व बँकाचे संचालक मंडळ व कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्यावददल संस्थेच्या वतीने आभार मानतो .

३)संस्थेचे अंतर्गत लेखापरिक्षक **सौ . जोशी एस एस व** वैद्यानिक लेखापरिक्षक **सौ . बी टी जाधव** यांचेही आभार .

५)पुणे जिल्हा पत फेडरेशनचे अध्यक्ष मा . श्री . अनिल भोसले यांचेही आभार .

## संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा

| तपशील | ३१ . ०३ . २०१९ | ३१ . ०३ . २०२० | ३१ . ०३ . २०२१ | ३१ . ०३ . २०२२ |
|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | ६६१ | ७०० | ७३६ | ७७८ |
| वसुल भागभांडवल | ३१,७०,६०० . ०० | ३९,३९,७०० . ०० | ४१,९६,००० . ०० | ४५,३६,९०० . ०० |
| निधी | १८,९५,७९९.९० | २६,३९,६३७ . ३२ | ३६,५४,९६५.०४ | ४६,०८,९१५.७८ |
| ठेवी | ४,४०,८२,४७६ . ०० | ५,२२,८३,६९२ . ०० | ४,९०,८४,९९०.५४ | ६,५९,५९,४८५.९० |
| कर्ज | ३,४८,०७,७८९ . ०० | ४,३०,९१,३१० . ०० | ४,२७,७४,१८६ . ०० | ५,००,८८,९४६ . ०० |
| गुंतवणुक | १,२६,८५,९७४ . ०० | १,४५,०५,५७० . ०० | १,३३,३९,९४७ . ०० | २,३३,६९,८६९ . ०० |
| नफा | ५,०९,८३४ . २२ | ५,०३,८५७ . ७२ | २,२५,३५६.७४ | ७,४६,४०९.०३ |
| खेळते भांडवल | ४,९६,८९,३३५ . ८० | ५,९४,४३,५८० . ७० | ५,८०,३७,६९९.०० | ७,८९,४०,२८८.०८ |
| ऑडिट वर्ग | ' अ ' | ' अ ' | ' अ ' | ' अ ' |

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

## ठेवीवरील आकर्षक व्याजदर

| रक्कम | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवस ते १८० दिवस | ७ % |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | ८ % |
| १२ महिने ते २४ महिने | ९% |
| २५ महिने पेक्षा अधिक | ९.५% |
| वचत ठेव खाते | ५% |

## पेन्शन ठेव योजना

| गुंतवणूक रक्कम | दरमहा मिळणारे व्याज |
|---|---|
| रू.१,००,०००/- | ८७५.०० |
| रू.५०,०००/- | ४३८.०० |
| रू.२५,०००/- | २१९.०० |
| टिप ः गुंतवणुक कालावधी कमीत कमी २५ महिने | |
| दैनंदिन ठेव खाते ६% | |

### संस्थेची वैशिष्टये संस्थेची

१. संपुर्ण संगणकीकृत कामकाज.

२. कार्यक्षम संचालक मंडळ.

३. ठेवीवरील आकर्षक व्याजदर.

४. ऑडिट वर्ग ' अ '

५. प्रशिक्षित कर्मचारी वर्ग.

### कार्यालयीन वेळ

सोमवार ते शनिवार स.०९.३० वा ते दु.१.३० वा.

दु.४.०० वा ते सायं.६.३० वा.

दुसरा व चौथा शनिवार सुट्टी

रविवार साप्ताहिक सुट्टी

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

## अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल

मी **श्रेयस को-ऑप केडीट सोसायटी लि .**, नवी सांगवी,पुणे-४११०२७ . संस्थेचा सोवत जोडलेल्या दिनांक ३१ मार्च २०२२ या दिनांकाच्या ताळेवंद व मन २०२१-२०२२ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून असा अहवाल करतो की,

१ . माझ्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी,माझ्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे उपलव्ध झाले आहे .

२ . माझ्या मते मला मिळालेल्या खुलाशाचे आधारे

अ) ताळेवंद नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोवी पुस्तकाशी जुळत असुन ३१ मार्च २०२२ या दिनांकाच्या संस्थेच्या कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो . आणि नफा-तोटा पत्रकावावतीत त्या दिनांकास संपणा-या वर्षातील नफा -तोटयाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो .

व) संस्थेचे हिशोव व त्यातील टिपणीस पात्र राहुन महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्कय ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो .

३ . माझ्या मते सहकारी संस्थांचा कायदा व नियम पोटनियम या नुसार आवश्यक असणारे हिशेव व पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत .

स्थळ ः नवी सांगवी .

दिनांक ः ०२ . ०५ . २०२२

**सौ . जोशी एस एस**

अंतर्गत लेखापरिक्षक

# श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि . नवी सांगवी पुणे ४११०२७ .

## शासकीय लेखापरिक्षण अहवाल

**महाराष्ट्र संस्थांचा कायदा कलम महाराष्ट कलम ८१ (५- ब) सहकारी संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा अहवाल**

मी **श्रेयस को-ऑप केडीट सोसा लि .**,नवी सांगवी, पुणे-४११०२७ . या संस्थेचा सोवत जोडलेल्या दिनांक ३१ मार्च २०२२ या दिनांकांच्या ताळेवंद व सन २०२१-२०२२ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून असा अहवाल करतो की,

१ . माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत .

२ . माझ्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल,त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोवाची पुस्तके ठेवलेली आहेत .

३ . मी तपासलेल्या ताळेवंद पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोवाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत .

४ . माझ्या मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलाशावरून हे हिशोव महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० हा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात .

१) ताळेवंदाच्या वावतीत दिनांक ३१ मार्च २०२२ ची संस्थेच्या परिस्थितीची नफ्याची /तोटयाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात .

१) नफा तोटा पत्रकाच्या वावतीत या दिनांकास संपणा-या वर्षाच्या अगर मुदतीत संस्थेच्या नफ्याची व तोटयाची लेखापरिक्षण अहवाल भाग अ,व व क मध्ये अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे .

५ . सहकारी वर्ष २०२१-२०२२ करिता संस्थेस ऑडीट वर्ग "अ" वर्ग देण्यात आलेला आहे .

स्थळ : नवी सांगवी .

दिनांक : ०२ . ०५ . २०२२

**बी टी जाधव**

प्रमाणित लेखापरिक्षक,

सहकारी संस्था,पुणे

# श्रेयस को-ऑप क्रेडीट सोसा लि. नवी सांगवी पुणे ४११०२७.

बुक पोस्ट

प्रति,

सभासदांचे नाव ______________________

______________________

______________________

प्रेषक

**श्री. सतीश अशोक मदने**

चेअरमन

**श्रेयस को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.**

"शिव अपार्ट"गणेश मंदीरासमोर,फेमस चौक,नवी सांगवी

पुणे-४११०२७.